प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा.
आदेश क्रमांक-२७४ सन २०२५, दिनांक- ३१/०७/२०२५.

पहा:- १) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक- २६४/२०२५, दिनांक १९/०७/२०२५.

२) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक डिईएस/सीओएम/६१/२०२४/३५१८/२०२५-५५३३, दिनांक-१८/०७/२०२५.

३) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक डिईएस/सीओएम/६६/२०२४/३५२६/२०२५-५५४०, दिनांक-१८/०७/२०२५.

संदर्भ क्रमांक १ नुसार बुलडाणा न्यायिक जिल्हयाच्या अंतर्गत दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवरील व सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, खामगांव यांचे न्यायालयातील रिक्त असलेल्या कनिष्ठ लिपीक व शिपाई या पदाच्या अनुषंगाने तसेच संदर्भ क्रमांक २ व ३ नुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशान्वये अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना खालील प्रमाणे नियुक्ती आदेश पारीत करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्मचा-याचे नांव व पदनाम	नविन नियुक्ती व स्थळ
०१	श्रीमती प्रतिभा विलास बाजारे, अनुकंपा तत्वावरील उमेदवार.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर श्री. एम.एच.शेख यांचे पुर्वीचे रिक्त असलेल्या पदी कनिष्ठ लिपीक म्हणून नविन नियुक्ती.
०२	श्रीमती उषा विजय जाधव, अनुकंपा तत्वावरील उमेदवार.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे न्यायालयात रिक्त असलेल्या पदी शिपाई म्हणून नविन नियुक्ती.

नव नियुक्त उमेदवार श्रीमती प्रतिभा विलास बाजारे व श्रीमती उषा विजय जाधव यांना सुचित करण्यात येते की, त्यांची या आदेशाद्वारे करण्यात आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

त्यांची नियुक्ती ही मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे नियमाला तसेच जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांच्या भविष्यात होणाऱ्या आदेशाला अधीन राहुन करण्यात आलेली आहे याची त्यांनी नोंद घ्यावी. त्यांना

पुढेही असे सुचित करण्यात येते की, त्यांनी हा आदेश मिळाल्यापासुन ०७ दिवसाचे आंत त्यांचे पदी रुजू व्हावे, तसे करण्यास चुकल्यास त्यांचा नियुक्तीचा आदेश रद्द करण्यात येईल.

पिठासीन अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, नवनियुक्त उमेदवार हे आपले आस्थापनेवर रुजू होताच त्यांचे कडून आवश्यक ते प्रतिज्ञापत्र घेवुन व साक्षांकन नमुना दोन प्रती मध्ये भरुन या कार्यालयाकडे न चुकता पाठवावे.

RKade
31/07/2025
(आर.एन.रोकडे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

पृष्ठांकन क्रमांक/आस्था./४१५९ /२०२५, दिनांक- ३१/०७/२०२५
प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

०१) मा. प्रबंधक (Personnel) कार्मिक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

RKade
31/07/2025
(आर.एन.रोकडे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

०२) दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव.

०३) श्रीमती प्रतिभा विलास बाजारे, रा. केदार, ता. नांदुरा, जि. बुलडाणा (नोंदणीकृत डाकेने पोच पावती सह).

०४) श्रीमती उषा विजय जाधव, रा. केळवद, ता. चिखली, जि. बुलडाणा, ह.मु. गौरक्षण रोड, जुने आर.टी.ओ. कार्यालयासमोर, अकोला, ता. जि. अकोला (नोंदणीकृत डाकेने पोच पावती सह).

०५) अधिक्षक (कार्यव्यवस्थापन विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०६) सहायक अधिक्षक(आस्थापना / वित्त व लेखा विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०७) वरिष्ठ लिपीक (वेतन देयक), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०८) सहायक, संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा, यांना निर्देशीत करण्यात येते की त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.

०९) कार्यालय प्रत.

Tontalke
उ.प्रबंधक
जिल्हा न्यायालय, बुलडाणा